**दिनेश**
**बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टं सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१२ । शनिवार १६ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## पारनेर तालुक्यात व्यापाऱ्याचा खून करून साडेबारा लाखांची लूट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील भांडगाव येथे डोक्यात लोखंडी हत्याराने मारून व्यावसायिकाचा खून करत घरातील अकरा लाख रुपयांची रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे साडेबारा लाख रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. संदीप भास्कर खरमाळे (वय-५३ वर्षे, रा. भुजबळवस्ती, भांडगाव ता. पारनेर) असे मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेत ११ लाख ५० हजार रु रोख रक्कम, ७५ हजार रुपये किमतीचे अडीच तोळा वजनाचे सोन्याचे ब्रेसलेट, ४५ हजार रुपये किमतीच्या सुमारे १५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या असा एकूण १२ लाख ७० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरीला गेला आहे. याबाबत पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मृताचा मुलगा सिद्धेश संदीप खरमाळे (वय २८ वर्षे) ■ पान ४ वर

### रात्रीचे बोलणे ठरले शेवटचे...

दरम्यान, दिनांक १४ रोजी नगरहून घरी गेल्यानंतर सायंकाळी साडेसातला वडिलांना फोन करून घरी पोहचले का, अशी विचारपूस फिर्यादीने केली होती. त्यावेळी वडील चुलते प्रकाश खरमाळे यांच्या घरी होते. दिनाक १५ रोजी रात्री १२.३४ वाजता वडील संदीप मुलगा सिद्धेश यास फोन करून म्हणाले की, तुला दुसरी मुलगी झाली म्हणून नाराज होऊ नको. जमिनीचे व्यवहाराचे झाले आहे, खरेदीखताचा ड्राफ्ट तुला मोबाईलवर पाठवतो, तू काळजी नको करु. असे बोलणे झाल्यावर नंतर सकाळपर्यंत ड्राफ्ट पाठवला नाही म्हणून फोन केला असता वडिलांचा फोन बंद आला. दिनांक १५ रोजी दुपारी साडेतीनपर्यंत फोन बंदच येत असल्याने त्यांनी चुलत आजोबा देविदास नागू खरमाळे यांना फोन करुन वडील संदीप सोबत आहेत का? त्यांचा फोन बंद येत आहे, असे कळविले. त्यानंतर देविदास खरमाळे हे गणेश झंझाड यांच्यासोबत घरी भुजबळवस्ती, भांडगाव येथे जाऊन पाहिले असता घराच्या पाठीमागील बाजूस शेडमध्ये बाजेवर वडील मृतावस्थेत पडलेले दिसले. त्यांच्या डोक्यास मार लागून त्यातून रक्त आलेले होते.

### मृताच्या गळ्यातील पाच तोळ्याची चेन तशीच

शेडमधील स्टोअर रुममध्ये पैसे आहेत अगर कसे याची खात्री केली असता ११ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम तेथे मिळून आली नाही. घरातील बेडरुममधील कपाटातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे ब्रेसलेट, दोन अंगठ्या असे मिळून आले नाही. त्याच कपाटामध्ये दुस-या डब्यात ठेवलेले मंगळसूत्र, कानातील झुबे, वेल हे कपाटात मिळून आले. तसेच मृत संदीप खरमाळे यांच्या गळ्यामध्ये असलेली पाच तोळ्याची सोन्याची चेन वडिलांचे गळयात तशीच होती. कपाटामध्ये दुस-या डब्यात ठेवलेले मंगळसूत्र, कानातील झुबे, वेल हे तेथेच मिळून आले. त्यामुळे या चोरीचे गूढ वाढले आहे.




आज शनिवार श्री शनी जयंती आणि शनी अमावस्या असा त्रिवेणी संगम यानिमित्त श्री क्षेत्र शनी शिंगणापूर येथे भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती ( फोटो - राजू खरपुडे ,नगर)

### नगरसेवक निखिल वारे यांचे पालकमंत्र्यांना साकडे

## नगर शहरासह उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करावा

**खंडित वीजपुरवठ्याने नागरिक हैराण । उद्योग–व्यवसायावर परिणाम**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर व उपनगरांमधील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने उन्हाळ्याच्या दिवसांत नागरिक हैराण झाले आहेत. त्याचप्रमाणे व्यावसायिक, उद्योजकांचे नुकसान होत असून, या गंभीर प्रश्नाबाबत महावितरण अधिकारी व कर्मचारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी-कर्मचा-यांना योग्य ते आदेश देऊन नगर शहरासह उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक तथा भाजपचे जिल्हा महामंत्री निखील वारे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

निवेदनात वारे यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर शहर व उपनगरातील पाणीपुरवठा गेल्या २ ते ३ महिन्यांपासुन पुर्णपणे विस्कळीत झालेला आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची जादा प्रमाणात आवश्यकता असते. शहर व उपनगरांमधील वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असून, त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे.

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे व्यावसासिक व उद्योजकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे शहर व उपनगरांमध्ये छोटे-मोठे व्यावसायिक आईस्क्रीम, लस्सी, थंडपेय अशा विविध प्रकारचे व्यवसाय करीत असतात. परंतु वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे या व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. रात्री-अपरात्री वीजपुरवठा खंडीत होत असल्याने अनेक ज्येष्ठ नागरिक, रुग्णांना उष्णतेमुळे श्वास घेण्यास त्रास होतो तसेच लहान मुलांनाही वीज खंडीत झाल्यामुळे झोपेच्या त्रासास सामोरे जावे लागत आहे. तरी नगर शहर व उपनगरातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण कंपनीच्या संबंधित अधिका-यांना व कर्मचा-यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत, अशी मागणी नगरसेवक निखील वारे यांनी निवेदनात केली आहे.



### अधिकारी–कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे

महावितरण कंपनीकडून नगर शहर व उपनगर तसेच वसंत टेकडी येथील वीजपुरवठा वारंवार खंडीत केला जातो, संबंधित अधिका-यांच्या तसेच कर्मचा-यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते लवकर फोन उचलत नाहीत अथवा फोन उचलल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देतात. महावितरणचा सावळागोंधळ, अचानकपणे वीजपुरवठा खंडीत करणे या कारणांमुळे नागरिकांना पुरेशा प्रमाणात व वेळेवर पाणीपुरवठा केला जात नसल्यामुळे प्रभागातील नागरिक अक्षरशः वैतागलेले आहेत. यामुळे नाहक महापालिकेविषयी नागरिकांच्या मनात तीव्र नाराजी व्यक्त होत असून विनाकारण प्रभागातील नगरसेवकांना नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे, असेही निखील वारे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## बिअरबार दुकाने फोडणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

**एलसीबीच्या कारवाईत साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त । पाच गुन्हे उघडकीस**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संगमनेर परिसरात बिअर बार दुकाने फोडणारी आंतरराज्य टोळी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपींकडून ०५ गुन्हे उघडकीस आले असून, ५ लाख ५५ हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त.करण्यात आला आहे.
दिनांक तीन मे रोजी फिर्यादी किशोर बाळाजी डोके (रा. खंदरमाळवाडी ता. संगमनेर) यांचे हॉटेल निलायम बार येथे कोणीतरी अज्ञात चोरट्याने शटरचे कुलूप तोडून हॉटेलमधील विविध कंपन्यांची ३ लाख ६ हजार १९० रुपये किमतीची विदेशी दारु, सिगारेट व सीसीटीव्ही कॅमे-याचा डीव्हीआर चोरुन नेला होता. या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना एलसीबीला हा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी हसन हमजा कुट्टी (रा. नाशिक)




याने साथीदारासह केला असुन तो साथीदारांसह नाशिक येथे असल्याची माहिती मिळाली. पथकाने मिळालेल्या माहितीनुसार म्हाडा बिल्डींग वडाळा, नाशिक येथून हसन हमजा कुट्टी (रा. नवनाथनगर, शेवाडी, पंचवटी नाशिक), आकाश सचिन सूर्यवंशी (रा. दत्त चौक, कालिकामाता मंदिराजवळ सिडको, नाशिक), मेहताब गुलाम रसूल अन्सारी (मूळ रा. नुरीनगर, कटहार तांडा, ता. निम्मेगड, जि. गिरटी झारखंड) यांना अटक केली. आरोपींनी बंटी दास (पूर्ण नांव माहित नाही रा. झारखंड याच्यासह केल्याची कबुली दिली. त्याचा शोध सुरू आहे. ■ पान ४ वर

### कारवाईत यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच पथकातील उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, विजय पवार, फुरकान शेख, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डिले, अमृत आढाव, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक महादेव भांड यांनी केली.

## भाड्याच्या उत्पन्नावर ५० टक्के कर म्हणजे नागरिकांवर अन्याय - नगरसेवक श्रीपाद छिंदम

**वाढीव घरपट्टीच्या मुद्द्यावरून मनपा प्रशासनाला जाब; सभा तहकूब प्रकरणावरूनही आरोप–प्रत्यारोप । महासभेपूर्वी महापौरांना सविस्तर पत्र; वाढीव पाणीपट्टीचाही विरोध**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शहरातील वाढीव घरपट्टी, भाडेआधारित कर आकारणी आणि प्रस्तावित पाणीपट्टी वाढीच्या मुद्द्यावरून महानगरपालिकेचे वातावरण तापले असून नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी प्रशासनाच्या धोरणांवर जोरदार आक्रमण केले आहे. महानगरपालिकेच्या १५ मे रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेपूर्वी त्यांनी महापौरांना सविस्तर पत्र देत नागरिकांवर लादण्यात येणारा आर्थिक बोजा तातडीने कमी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यानंतर नगरसचिवांकडून नगरसेवकांची दिशाभूल करण्यात आल्याचा गंभीर आरोपही छिंदम यांनी केला आहे.

सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ९ संदर्भात पाठवलेल्या पत्रात छिंदम यांनी म्हटले आहे की, शहरात नव्याने करण्यात आलेल्या मोजमापानुसार नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाढीव घरपट्टीच्या नोटिसा मिळत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. प्रशासन ''घरपट्टी वाढ केलेली नाही'' असा दावा करत असले तरी प्रत्यक्षात व्हॅल्युएशनच्या २७ टक्के कर आकारून त्यावर पथकर २ टक्के, ड्रेनेज कर ५ टक्के, अग्नी कर २ टक्के, ■ पान ४ वर

### अहिल्यानगर पोलीस दलाची मान उंचावली..!

## कर्तव्यदक्ष हवालदार राजू सुद्रिक यांना मानाचे पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या हस्ते गौरव**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पोलीस दलात प्रामाणिक सेवा आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवानाचा गौरव होणे,हा संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण असतो.असाच एक सुवर्णक्षण अहिल्यानगर पोलीस दलाने अनुभवला आहे.आपल्या १५ वर्षांच्या अविरत आणि निष्कलंक सेवेचे फळ म्हणून पोलीस हवालदार श्री.राजू आप्पासाहेब सुद्रिक यांना महाराष्ट्र पोलीस दलातील अत्यंत प्रतिष्ठेचा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ.राधाकृष्ण विखे पाटील आणि नूतन पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा दिमाखात पार पडला.



**१५ वर्षांच्या निष्ठेचे फलित!**

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सन २०२५ या वर्षासाठीचे सन्मानचिन्ह नुकतेच घोषित करण्यात आले होते. राज्यभरातील ८०० निवडक अधिकारी आणि अंमलदारांच्या ■ पान ४ वर

## कमर्शियल गाळ्यांच्या वाटपावरून राष्ट्रवादी – भाजप नगरसेवकांत तू, तू – मै, मै झाल्यामुळे सभा स्थगित

**ठाकरे शिवसेना महानगर प्रमुख किरण काळेंचा दावा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मनपाची नियोजित सर्वसाधारण सभा अचानक तहकूब झाली. सुमारे ११४ कोटींच्या कर्जावर उभारण्यात येणाऱ्या नियोजित पाच व्यापारी संकुलांतील कमर्शियल गाळ्यांच्या वाटपाचा मलिदा कोणी किती खायचा यावरून राष्ट्रवादी - भाजप नगरसेवकांत तू, तू - मै, मै झाल्यामुळे सभा तहकूब करण्याची नामुष्की ओढवल्याचा दावा, ठाकरे शिवसेना महानगर प्रमुख किरण काळेंनी केला आहे. ही सभा तहकूब झाल्यामुळे काही भ्रष्ट अधिकारी, राजश्रयीत ठेकेदार यांचा देखील हिरमोड झाल्याचे काळे म्हणाले.

दोघांची सत्ता असली तरी राष्ट्रवादी अजित पवार गटच सबकुछ आहे. त्यांचीच मनमानी आहे. राष्ट्रवादीचे स्थानिक नेतृत्व भाजपला कवडीची ही किंमत देत नाही. पालकमंत्री ज्येष्ठ व अनुभवी नेते असून देखील त्यांचाही मान राखला जात नाही, असा दावा काळेंनी केला आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी लग्नसराई मुळे सभा रद्द झाल्याचा खुलासा केला. तो धादांत खोटा असल्याचे म्हणत काळे म्हणाले, आयुक्त अजून किती दिवस लिहून दिलेले स्क्रिप्ट वाचणार आहेत ? ते आयुक्त आहेत की कुण्या एका राजकीय नेत्याचे प्रवक्ते ?, असा सवाल त्यांनी केला आहे.

**गाळ्यांचा मालिद्या वरून वरून नगरसेवकांत हमरी – तुमरी :**



काळेंनी दावा केला की, गुरुवारी रात्री उशिरा सावेडीत एका भाजप पदाधिकाऱ्याच्या घरी शहरातील सत्ताधारी नगरसेवकांची अनौपचारिक बैठक झाली. दोन्ही पक्षांचे प्रमुख नगरसेवक यावेळी उपस्थित होते. पाच व्यापारी संकुलां मध्ये मिळून लाखो स्क्वेअर फिटचे शेकडो कमर्शियल गाळे कर्ज घेऊन बांधण्याचा घाट सत्ताधाऱ्यांचा आहे. मात्र हे गाळे बांधण्या पूर्वीच भाजपच्या नगरसेवकांना राष्ट्रवादी पेक्षा जास्त गाळे आणि त्यांचा मालिद्याच वाटप करून हव आहे.
राष्ट्रवादी तो द्यायला तयार नाही. आमदार आमचा असल्यामुळे आम्हाला जास्त गाळे हवेत, असा राष्ट्रवादीचा दावा आहे. यावरून त्या बैठकीत जोरदार वादंग झालं. दोन्ही गटाचे नगरसेवक एकमेकावर अक्षरशः धावून गेले. त्यांच्यात हमरी - तुमरी झाली. त्यांना जनतेच्या प्रश्नांशी काही एक देणं - घेणं नसून निवडणूक ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अधिक मासानिमित्त आयोजित महिला व उद्योजकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन



अहिल्यानगर-अधिक मासानिमित्त प्रतिबिंब संस्थेच्या पुढाकारातून महिला व उद्योजकांसाठी चांगल्या प्रकारे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळते.व नवीन व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ खुले झाले आहे.शहराच्या मध्यवर्ती भागात हे प्रदर्शन असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळणार आहे.तसेच प्रत्येकाला आपल्या व्यवसायाची ब्रॅण्डिंग करण्यासाठी व मार्केटिंग व प्रचार करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे.या उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी होऊन वर्षभर ग्राहक जोडले जाणार असल्याचे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी केले आहे. अधिकमासा निम्मित १६ व १७ मे रोजी प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय ,दिल्लीगेट येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील२५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळाच्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी,संयोजिका अनुजा कांबळे,वनिता मानकर,जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे ,प्रिया भागवत आदी उपस्थित होते.दि.१६ व १७ मे या कालावधीत २ दिवसीय प्रदर्शन सर्वासाठी खुले असणार आहे.या प्रदर्शनीत खरेदीसाठी कपडे, ज्वेलरी,लोणचे,पापड, मसाले, कडधान्य,कॉस्मेटिक,किड्स वेअर,फुड स्टॉल,नॅचरोपॅथी, आयुर्वेद,उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू आदी बरेच काही स्टोल असणार आहेत. तरी नगरकरांनी एकदा तरी प्रदर्शनाला भेट देऊन व्यवसायिकांना प्रोत्साहन द्यावे.असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### भिंगारमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

अहिल्यानगर - हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात आयोजित कार्यक्रमात स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले. तर मिठाईवाटप करुन जयंती सोहळ्याचा आनंद व्यक्त करण्यात आला. या जयंती सोहळ्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सीए रविंद्र कटारिया आणि डॉ. दमन काशीद यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून टाकला. यानंतर जॉगिंग पार्क परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नागरिकांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेत परिसरातील कचरा हटवून स्वच्छतेचा संदेश दिला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. सुनील जाधव आणि ताराचंद ठोकळ यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, जहीर सय्यद, रमेश वराडे, सुवेंद्र कटारिया, सचिनशेठ चोपडा, सुनील जाधव, सर्वेश सपकाळ, सुधीर कपाळे, अविनाश पोतदार, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रतन मेहेत्रे, सचिन परदेशी, विलास आहेर, ताराचंद ठोकळ, दिलीप ठोकळ, दिपकराव घोडके, योगेश चौधरी, अभिजीत सपकाळ, दिलीप गुगळे, मराठा पतसंस्थेचे संचालक अच्युतराव गाडे, गणेश सातकर, नवनाथ वेताळ, इंजि. अनिल सोळसे, निजाम पठाण, नवनाथ खराडे, कुमार धतुरे, सरदारसिंग परदेशी, दिनेश शहापूरकर, दशरथ मुंडे, आनंद राठोड, दीपक अमृत, मेजर विनोद खोत, विशाल भामरे, एकनाथ जगताप, डॉ. गायत्री कुलकर्णी, प्रा. सारिका रघुवंशी, मीनाताई परदेशी आदी उपस्थित होते.

# अभिनयातून माणसं वाचायला मिळाली - अभिनेते योगेश सोमण

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**''लेखन प्रशिक्षण दिग्दर्शन आणि अभिनय या सिने सृष्टीतील टप्प्यात माझ्या दृष्टीने अभिनय हा हा ''क्राफ्ट वर्क ''मध्ये शेवटच्या पायरीवर आहे .तरीही अभिनयाने मला ''चेहरा'' दिला हे सत्य असले तरी माझ्या दृष्टीने अभिनयातून मला माणसं वाचायला मिळाले. त्यातून जीवन समृद्ध होत गेले'' असे प्रतिपादन चित्रपट अभिनेते ,नाट्य कलाकार व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी व्यक्त केले .अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेच्या उद्घाटन सत्राचे पहिले पुष्प गुंफताना''माझ्या भूमिकेने मला काय दिले'' या विषयावर सोमन बोलत होते.

यावेळी वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटक जिल्हा ग्रंथालयाचे निरीक्षक रामदास शिंदे ,वाचनालयाचे कार्यवाह, विक्रम राठोड ,उपाध्यक्ष दिलीप पांढरे, मसाप चे जिल्हा अध्यक्ष जयंत येलुलकर ,संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, संयोजिकाशिल्पा रसाळ, वैद्य राजा ठाकूर ,किरण आगरवाल, राहुल तांबोळी, कवि चंद्रकांत पालवे ,ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

रसिक नगरकरांच्या गर्दीने गच्च भरलेल्या सभागृहात जीवन प्रवासातील अनेक भूमिका विषयी बोलताना सोमण यांनी मंत्रमुग्ध केले. ''लहानपणी प्रारंभी नाटकात राजा भरताची ''प्रॉम्प्टर'' म्हणून दुय्यम भूमिका मिळाली असताना स्टेजवर कब्जा मिळवण्याची'' झिंग'' या वाटेवर प्रेरक ठरली. नाटकामध्ये २५ वर्ष भूमिका करताना छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, चाणक्य यासारख्या महान व्यक्तींचा अभ्यास व अभिनयाच्या क्षमता यातून निर्माण होत गेल्या. नाट्यक्षेत्रातून सिनेक्षेत्रात पाऊल टाकताना मालिकांच्या माध्यमातून अल्पावधीत मला भूमिकांनी नवा चेहरा दिला. पुणे ते मुंबईचा हा प्रवास खडतर तसाच त्यात सामावल्यावर ''शिप'' मध्ये काम करणाऱ्या नोकरदारासारखा होता. ''डेली सोप'' मध्ये भूमिका सुरू झाल्यावर ''नांदा सौख्य भरे'' मधील सात्विक भूमिका ते ''क्राइम पेट्रोल '' मधील पोलिस अधिकाऱ्याची भूमिका यातून वेगवेगळ्या प्रेक्षक वर्गात मी त्यांच्या घरातील एक'' चेहरा ''झालो. त्यातून चैनल ची ताकद मला समजली. हिंदी चित्रपट सृष्टीत ''दृश्यम'' च्या माध्यमातून भूमिकांमध्ये प्रवेश करताना मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील फरक, व्यावसायिक शिस्त, यातील फरक मला माझ्या समजला. माझ्या चेहऱ्यामुळे प्रथमच मला ''उरी'' चित्रपटातून संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांची भूमिका मिळाली. या ''डिफेन्स मिनिस्टर''भूमिकेमुळे आयुष्यभरासाठी मला नवीन ओळख या अभिनयाने दिली. इतकेच नव्हे तर गोव्यात गेल्यावर जनसामान्यातील माणसाला ती किती जवळची वाटली याचा अनुभव अनेक वेळा आला .

पुढे बोलताना सोमण यांनी नाट्य सेनेसृष्टीच्या प्रवासात संतश्रेष्ठ तुकारामांच्या ''आनंद डोह ''या प्रयोगातून सद्गुरु ,अध्यात्म व अदृश्यशक्ती तुन मी नव्हे तर परमात्म्यामुळे माझ्याकडून करून घेतलेले कामातून माझा अहंकार गळून पडला. आपण हाती घेतलेला कामाचा ''संकल्प ''सोडून लेखन, सादरीकरण, घंटानाद या साऱ्यांचा घडत गेलेला चमत्कार हा माझा नव्हे तर ब्रम्हांडातील अदृश्य शक्तीचा असल्याचे सांगून या सगळ्यातून माझ्यातील व्यक्तीमत्त्वाच्या स्निग्धतेत भर पडत गेली असल्याचे प्रांजळपणे व्यक्त केले .

यावेळी उद्घाटक रामदास शिंदे यांनी ''जिल्हा वाचनालयाची वसंत व्याख्यानमालेची परंपरा ही माणूस घडवण्याची अखंड यात्रा आहे. उत्तंग व्यक्तिमतची माणसे ,त्यांचा प्रवास यावेळी ऐकणेही मोठी पर्वणी असून रसिक नगरकरांनी स्वतःला या अनुभवातून समृद्ध करून घ्यावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रसिद्ध सिनेकालाकार मोहनिराज गटणे व ज्येष्ठ रंगकर्मी पीडी कुलकर्णी ,जयंत येलूलकर विभागीय कार्यवाह पदी निवड झाल्या बद्दल यांचा जिल्हा वाचनालयाचे वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास साहित्य ,नाट्य, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील असंख्य रसिक उपस्थित होते. प्रास्ताविक आणि आभार प्रा.ज्योती कुलकर्णी तर परिचय शिल्पा रसाळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कर्मचारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रयत्न नर्सिंग कॉलेजमध्ये आशा सेविका व परिचारिकांचा सन्मान




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सामाजिक आरोग्य सेवा प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात परिचारिकांइतकाच आशा सेविकांचाही महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे प्रतिपादन तोफखाना आरोग्य केंद्राच्या स्टाफ इन्चार्ज कविता खिल्लारी यांनी केले. गुलमोहर रोड येथील प्रयत्न नर्सिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमात महानगरपालिकेच्या विविध नागरी आरोग्य केंद्रांतील स्टाफ नर्सेस तसेच आशा सेविकांचा सन्मान करण्यात आला. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या आशा सेविका व परिचारिकांच्या कार्याचा विशेष गौरव यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाला महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रांतील स्टाफ नर्सेस वैशाली आनंदकर, स्वाती कांबळे, सुनिता चौधरी, ज्योती बांगर,अश्विनी लोखंडे, स्वाती पिसे,वर्षा कोल्हे, कविता खिल्लारी,अलका शेंडे आदी उपस्थित होत्या.

यावेळी कविता खिल्लारी यांनी प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या विविध नागरी आरोग्य केंद्रांमध्ये प्रशिक्षणाद्वारे समाजसेवेची संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. तसेच कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करून त्यांना नर्सिंग व्यवसायासाठी सक्षम बनवत असल्याबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले.

तोफखाना आरोग्य केंद्राच्या स्टाफ नर्स वर्षा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांनी नर्सिंग व्यवसाय सेवाभावी वृत्तीने व जबाबदारीने पुढे नेण्याचे आवाहन केले. संस्थेच्या संचालिका डॉ. शितल म्हस्के यांनी परिचारिका व आशा सेविका या समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

प्राचार्य दिक्षा घाटविसावे यांनी आशा सेविकांनीही नर्सिंग शिक्षण घेऊन प्रशिक्षित परिचारिका बनण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन केले. व्यवस्थापक मीना लाड यांनी स्टाफ नर्सेस व आशा सेविकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला उपप्राचार्य स्मिता तडके, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने आशा सेविका व स्टाफ नर्सेस उपस्थित होत्या.

# श्री विद्यानिकेतन (एस व्ही एन) क्लासच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत मिळवले घवघवीत यश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री विद्या निकेतन क्लासच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. क्लास गेली १५ वर्षे सातवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच आत्मविश्वास सातत्यपूर्ण सरावाच्या माध्यमातून यशाची जाणीव निर्माण केली जाते तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची रुजवणूक केली जाते.अशा परंपरेने एस व्ही एन क्लास विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन कीर्तिमान प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील असते.

अशोक भाऊ इंग्लिश मीडियम ची विद्यार्थिनी जोया बागवान हिने ९९.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.तसेच अनन्या सोले ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल मधील विद्यार्थिनीने ९८ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तसेच दिशाली मुथा हिने ९८ टक्के गुणांसह अशोक भाऊ इंग्लिश मीडियम स्कूल मधून तृतीय क्रमांक प्राप्त केला तसेच अमृता काळे हिने ९७% गुण मिळवत सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूल मधून द्वितीय क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला.

क्लास मधील ३५ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले असून ५५ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन केले आहे. क्लासच्या तीन विद्यार्थ्यांना संस्कृत विषयात शंभर पैकी १०० गुण मिळाले आहेत.

विद्यार्थ्यांना राहुल कुलकर्णी , सिद्धार्थ भिंगारकर, आसमा सय्यद, मनोहर जिंदम,शोभना गायकवाड,अर्चना पलूसकर, क्षितिजा होशिंग या तज्ञ शिक्षकांनी मार्गदर्शन करून त्यांना या यशापर्यंत पोहोचवले आहे. क्लासच्या सावेडी,भिंगार व वाडीयापार्क येथे शाखा आहेत.

# धर्मवीर संभाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी – आ. विलास भुमरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**पैठण–** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पैठण तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या आगळ्यावेगळ्या उपक्रमात तब्बल २० हजार वयापासून विद्यार्थ्यांच्या सहभागातून धर्मवीर संभाजी महाराजांचे भव्य रेखाचित्र साकारण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात इतिहासप्रेम, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

आमदार विलास भुमरे यांच्या प्रेरणेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण व्हावा तसेच शिक्षणासोबत संस्कारांची जपणूक व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आ. भुमरे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, धर्मवीर संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि धर्मरक्षणाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचणे काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण होत असून राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ होत आहे. या कार्यक्रमात विद्यार्थी, युवक, कलाकार आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी विद्यार्थी व कलाकारांचे मान्यवरांनी कौतुक केले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आगामी काळात आंदोलन उग्र होईल- रवींद्र राजदेव

## कांद्याच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा एल्गार; नगर–कल्याण महामार्ग रोखला



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** कांद्याला मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी गुरुवारी (दि. १५ मे) नगर–कल्याण राष्ट्रीय महामार्गावर टाकळी ढोकेश्वर येथे भव्य रस्ता रोको आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. राष्ट्रवादीचे नेते तथा नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली आणि खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. परिणामी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कांद्याला सध्या बाजारात अत्यंत कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याची तीव्र नाराजी आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. ''शेतकरी रात्रंदिवस कष्ट करून पिकवलेल्या कांद्याला कवडीमोल भाव मिळत आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नये. कांद्याला तात्काळ हमीभाव मिळाला पाहिजे, तसेच निर्यातबंदी पूर्णपणे हटवली पाहिजे. सरकारने वेळीच ठोस निर्णय घेतला नाही, तर आगामी काळात आंदोलन अधिक उग्र स्वरूप धारण करेल,'' असा इशारा राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव यांनी आंदोलनस्थळी दिला.

आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी कांद्याला योग्य हमीभाव देणे, निर्यातबंदी उठवणे, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे, शेतकऱ्यांची थकीत वीजबिले माफ करणे आणि पीकविम्याचा लाभ तातडीने मिळवून देणे या प्रमुख मागण्या केल्या. शेतकऱ्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पारनेर पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. टाकळी ढोकेश्वर चौक परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. आंदोलनकर्त्यांशी प्रशासनाने चर्चा करण्याचा प्रयत्न केला; मात्र मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा शेतकऱ्यांनी कायम ठेवला. अखेर प्रशासनाने मागण्यांचे निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आणि वाहतूक पूर्ववत करण्यात आली. या आंदोलनाला विविध राजकीय, सामाजिक संघटनांचा पाठिंबा लाभला. आंदोलनात राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, महिला आघाडीच्या नेत्या सोनिया राजदेव, निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर, सरपंच प्रकाश गाजरे, उपसरपंच रामभाऊ तराळ, ज्येष्ठ नेते शशिकांत आंधळे, शहराध्यक्ष संदीप मत, लखन ठाणगे, जालिंदर लंके, विक्रम काळे, विश्वास शेटे, सरपंच शिवाजी निमसे, पोपट गुंड, संदीप ठाणगे, सरपंच अभिजित झावरे, प्रकाश राजदेव, भाऊसाहेब चौधरी, भानुदास आग्रे, बाळासाहेब चिकणे, संतोष चिकणे, साहेबराव चिकणे, शिवराम चिकणे, रामभाऊ थोरात, सरपंच बापू ठुबे, आयुब हवलदार, गंगाराम चिकणे, रामदास साळवे, बापू नरड, पोपट नरड, राजेंद्र शेरकर, विकास दगाबाज, जयवंत वाळुंज यांच्यासह शेकडो शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# पोळ संस्कृत क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

## संस्कृत विषयात १०० टक्के निकाल; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अंबिकानगर, केडगाव येथील पोळ संस्कृत क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत संस्कृत विषयात उल्लेखनीय यश संपादन करत क्लासेसच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी क्लासचा निकाल शंभर टक्के लागला असून, अकरा विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवत उज्ज्वल यश प्राप्त केले आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही सरासरी ८५ ते ९० गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली असून, उर्वरित सर्व विद्यार्थ्यांचे गुण ८० च्या पुढे राहिल्याने संपूर्ण निकाल कौतुकास्पद ठरला आहे.

संस्थेच्या संचालिका प्रा. प्रियंका अभिजीत पोळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, संस्कृत हा स्कोअरिंग विषय असला तरी त्यासाठी योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण अभ्यास आवश्यक असतो. गेल्या १६ वर्षांपासून पोळ संस्कृत क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन दिले जात असून, दरवर्षी विद्यार्थी उत्तम यश संपादन करत आहेत. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यशाबद्दल संस्थेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास पालक, शिक्षक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्कृत विषयात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अनुष्का चव्हाण हिने ९८ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. श्रीराम ढोले याने ९७ गुण, राज खाकाळ व गौरव जाधव यांनी प्रत्येकी ९६ गुण, देवांश्री मोहिते हिने ९५ गुण मिळवले. तसेच प्रथमेश सांगळे, तृप्ती जपे, तुषार बारगजे आणि श्लोक वाळुंज यांनी प्रत्येकी ९४ गुण मिळवले. पुष्कर लोळगे याला ९१ तर नेहा लेहाने हिला ९० गुण प्राप्त झाले. अवधूत जेजूरकर याने ८९ गुण मिळवत विशेष यश मिळवले.

याशिवाय प्रांजल काळे, अवधूत धर्माधिकारी, निमिषा कांबळे, रुद्र गांधी, हर्षदा येवले, प्रणव वाबळे, अथर्व ननावरे, अमन लोखंडे, कृष्णा निमसे, सिद्धार्थ पाठक, मतिन पठाण, शुभम लेहाने आणि पार्थ अडोळकर आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी पोळ संस्कृत क्लासेसमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राधेय महिला गृह उद्योग आयोजित 'आनंद नगरी खरेदी महोत्सवा'चे आयोजन

अहिल्यानगर - स्थानिक महिला उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून देत ग्राहकांना विविध घरगुती व आकर्षक उत्पादनांची मेजवानी देणारा ''आनंद नगरी खरेदी महोत्सव'' येत्या शनिवार २३ व रविवार २४ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने हा महोत्सव इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, नागेश्वर मंदिर समोर, अहिल्यानगर येथे सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे. उन्हाळी सुटीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवामध्ये घरगुती उद्योगांच्या विविध उत्पादनांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून कपडे, ज्वेलरी, फूड प्रॉडक्ट्स, हस्तकला वस्तू, ब्यूटी प्रॉडक्ट्स यांसह गेम स्टॉल्स आणि आकर्षक लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे महिला, तरुणाई व कुटुंबीयांसाठी हा महोत्सव विशेष आकर्षण ठरणार आहे. यासोबतच स्थानिक व्यवसायिकांसाठीही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. केवळ ११०० रुपयांमध्ये व्यवसायाची जाहिरात करण्याची सुविधा आयोजकांनी उपलब्ध केली असून व्यवसायिकांनी स्वतःचे नाव व डिझाईन दिल्यास आयोजकांकडून ३३ आकाराचा बॅनर तयार करून देण्यात येणार आहे. ऑफलाईन खरेदीला प्रोत्साहन देत स्थानिक उद्योग व व्यवसायांना चालना मिळावी हा महोत्सवामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. महोत्सवात सहभागी होण्यासाठी व (स्टॉलसाठी नाव नोंदणी) इच्छुकांनी सौ. उज्ज्वला मालू (७०२०३ ५२८१२) तसेच सौ. स्वाती नागोरी (९६५७९ ११०६१) यांच्याशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### डॉ. रवींद्र कुटे यांच्यावरील कारवाईसाठी आयएमएची मागणी

अहिल्यानगर- पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) माजी राज्याध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे यांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर आयएमएने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करत संबंधित प्रकरणात कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. आयएमएने स्पष्ट केले आहे की, पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही सदस्याचे किंवा पदाधिकाऱ्याचे समर्थन संघटना करणार नाही. डॉ. रवींद्र कुटे यांच्या प्रकरणात पोलिस आणि न्यायालय पुराव्यांच्या आधारे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करतीलच, मात्र संघटनेनेही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आयएमएच्या घटनेनुसार आणि शिस्तीच्या नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्यासाठी अहिल्यानगर शाखेने डॉ. कुटे यांच्याविरोधातील शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव तात्काळ राष्ट्रीय अध्यक्षांकडे पाठविला आहे. संघटनेच्या प्रतिमेला धक्का पोहोचविणाऱ्या व्यक्तींवर नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले.दरम्यान, अहिल्यानगर आयएमएने महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभागासोबत खांद्याला खांदा लावून पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि 'बेटी बचाओ'सारख्या जनजागृती मोहिमांमध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेतल्याचे नमूद केले. ही सामाजिक बांधिलकी भविष्यातही कायम राहणार असल्याचे संघटनेने सांगितले.''संघटना कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठी आहे. कायद्याचे उल्लंघन झाल्यास न्यायालयीन तसेच संघटनात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. याबाबत आयएमएचे कोणतेही दुमत नाही,'' असे निवेदनात म्हटले आहे. अशी माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा आणि सचिव डॉ. मुकुंद तांदळे यांनी दिली.

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक आमदार किशोर दराडे यांची अधिकाऱ्यांना सूचना

**शिक्षण विभागाच्या बैठकीत शिक्षक संघटनांचा संताप; अडवणूक व आर्थिक त्रासाच्या तक्रारींचा पाढा | कार्यालयीन अधीक्षकांच्या बदली अथवा निलंबनाची मागणी; शिक्षक आमदारांनी घेतले फैलावर**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शुक्रवारी (दि. १५ मे) नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक पार पडली. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसमोर आपल्या अडचणींचा पाढा वाचत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीस जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, संध्या भोर यांच्यासह माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे सचिव संभाजी पवार, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, प्रा. सुनील पंडित, अमोल ठाणगे, रवी गावडे, अशोक आव्हाड, गोवर्धन पांडुळे, पद्माकर गोसावी, तौसिफ शेख, उमेश शिंदे, प्रसाद सामलेटी, संजय थोरात, रवींद्र डमाळे, देवढे सर, दिलीप काटे आदींसह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.



आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे व वैभव सांगळे यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान शिक्षकांनी त्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी, प्रशासकीय विलंब, आर्थिक अडचणी तसेच विभागीय स्तरावरील त्रुटींबाबत सविस्तर मांडणी केली. अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त केली. प्रलंबित मुख्याध्यापक मान्यता, निवडश्रेणी मान्यता, अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन या प्रश्नांवर चर्चा करत आमदार दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच रोस्टर तपासणीतील विलंब, संचमान्यतेतील त्रुटी दुरुस्तीचे रखडलेले प्रस्ताव, अनुकंपा नियुक्ती मान्यता, रजा कालावधीत नियुक्त शिक्षकांच्या मान्यतेसंदर्भातील अडचणी यावरही अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

शालार्थ प्रणालीमध्ये पोस्ट क्रिएशन, जन्मतारीख व नियुक्ती दिनांक दुरुस्तीसाठी शिफारशी उशिरा मिळणे, प्रस्ताव अडवून ठेवणे, पीएफ पावत्या, न परतावा व अंतरीम प्रलंबित पावत्या, प्रलंबित वैद्यकीय बिले तसेच एनपीएसमधील रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात वर्ग करताना होणारा विलंब या विषयांवर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी आमदार दराडे यांनी सर्व प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करत ते निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

बैठकीत उपस्थित शिक्षक व कर्मचाऱ्यांनी प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अशी मागणी केली. तर आमदार दराडे यांनी शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, अन्यथा पुढील काळात अधिक कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही दिला.

**कार्यालयीन अधीक्षकांविरोधात शिक्षक संघटनांचा संताप**

बैठकीत माध्यमिक शिक्षण विभागातील कार्यालयीन अधीक्षकांविरोधात शिक्षक संघटनांनी गंभीर आरोप केले. फायली मंजूर करण्यासाठी अडवणूक केली जाते, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहारासाठी त्रास दिला जातो, अशा तक्रारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडल्या. काही महिला कर्मचाऱ्यांनीही अडवणूक होत असल्याचे बैठकीत स्पष्टपणे सांगितले. यामुळे संबंधित कार्यालयीन अधीक्षकांचे निलंबन अथवा बदली करण्याची मागणी शिक्षक संघटनांच्या वतीने करण्यात आली. बैठकीस अनुपस्थित असलेल्या कार्यालयीन अधीक्षकांना तात्काळ संपर्क साधून बैठकीत बोलावून घेण्यात आले. त्यानंतर शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्याला चांगलेच फैलावर घेत, यापुढे अशा प्रकारच्या तक्रारी येऊ नयेत, अशी कठोर समज दिली.

## उन्हाच्या झळांनी जायकवाडी धरणाची पाणीपातळी घसरली

**वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ; दररोज २.१२४ दलघमी पाण्याची वाफ**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पैठण–** मराठवाड्यात वाढत्या उकाड्याचा फटका आता जायकवाडी धरणालाही बसू लागला आहे. तापमान ४३ अंशांच्या पुढे गेल्याने धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत असून, त्यामुळे पाणीपातळीत दिवसागणिक घट नोंदवली जात आहे.

जायकवाडी धरणातून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीडसह विविध भागांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. याशिवाय औद्योगिक वापर आणि शेती सिंचनासाठीही धरणातील पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्यावर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

धरण परिसरातील बाष्पीभवन मापन केंद्राच्या माहितीनुसार, सध्या दररोज सुमारे २.१२४ दलघमी पाण्याची वाफ होत आहे. गेल्या वर्षी झालेल्या चांगल्या पावसामुळे धरण समाधानकारक भरले होते. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात तातडीची पाणीटंचाई जाणवत नसली, तरी झपाट्याने कमी होणारी पाणीपातळी प्रशासन आणि नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

दरम्यान, तापमानात आणखी वाढ झाल्यास बाष्पीभवनाचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करण्याची गरज अधोरेखित होत आहे.



अहिल्यानगर विसापूर खुला कारागृह येथे नगर जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉ.संजय घोगरे,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी,तसेच वैद्यकीय अधिकारी नागरगोजे,यांनी विसापूर खुले कारागृहला भेट दिली असता कारागृह अधीक्षक इनामदार व क्रांती मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले. (छायाचित्र सय्यद शफी बाबा)





शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार योगामुळे

## माळीवाडा शनि मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार अत्यंत पवित्र योग यंदा एकाच दिवशी आल्याने शहरातील माळीवाडा येथील शनि मारुती मंदिर परिसरात विविध भक्तिमय ,धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते . माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या तसेच यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

(फोटो – राजू खरपुडे ,नगर)

## नेप्ती भारतीय डाक विभागाच्या आधार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय डाक विभागाच्या वतीने अहिल्यानगर आर. एस. (केडगाव) पोस्ट ऑफिसमार्फत आयोजित करण्यात आलेल्या विशेष आधार नोंदणी व अद्ययावत सेवा शिबिर उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाले. माननीय प्रवर अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आधार सेवांचा लाभ घेतला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

शिबिरामध्ये लहान बालकांची नवीन आधार नोंदणी, पाच वर्षे पूर्ण झालेल्या बालकांचे बायोमेट्रिक अद्ययावतीकरण, आधार कार्डशी मोबाईल क्रमांक संलग्न करणे तसेच नाव, पत्ता, जन्मतारीख, छायाचित्र आणि इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती व अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांच्या आधार संदर्भातील तक्रारी आणि अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

नेप्ती ग्रामस्थ व ग्रामपंचायतच्या सहकार्यामुळे हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. . .. ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात जाऊन आधार सेवा घेण्याची गरज भासू नये, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

शिबिरादरम्यान ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. अनेक नागरिकांनी आधारमधील त्रुटी दूर करून घेतल्या, तर काहींनी मोबाईल क्रमांक अद्ययावत करून घेत विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. दिवसभर डाक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मार्गदर्शन करत सेवा तत्परतेने उपलब्ध करून दिल्या. या कार्यक्रमास सब पोस्ट मास्टर अहिल्यानगर आर एस केडगाव अमित कोरडे ,आधार ऑपरेटर मदनलाल मीना, शिवम पवार, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले , हिराबाई राऊत, पायल साळवे,मंदा साळवे भानुदास फुले, शिवांश जपकर, श्रावण जपकर, हर्षद बेल्हेकर, विजय साळवे, संदेश साळवे, तनवी साळवे, करिष्मा साळवे, प्रथमेश वैराळ, शितल वैराळ, पियुष वैराळ, सर्वज्ञ चौरे, पप्पू वैराळ, आरा सय्यद ,गुलाब सय्यद, शायद सय्यद, महबूब सय्यद, मोहन कदम, रुबीना सय्यद, बिस्मिल्ला सय्यद, नितीन साळवे, उज्वला साळवे, वैशाली चौगुले, सीमा बंडोले, साधना पवार, गायत्री धोत्रे,रबिया सय्यद, व परिसरातील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मोदींचे आवाहन देशहितासाठीच; विरोधकांनी राजकारण करू नये

**भाजप शहर उपाध्यक्ष नरेश चव्हाण यांचे आवाहन**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक परिस्थिती आणि संभाव्य आव्हाने लक्षात घेऊन नागरिकांना केलेले काटकसरीचे आवाहन हे पूर्णपणे देशहितासाठी असल्याचे मत भाजप शहर जिल्हा उपाध्यक्ष नरेश चव्हाण यांनी व्यक्त केले आहे. विरोधकांनी या आवाहनाचे राजकारण न करता सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा, असेही त्यांनी म्हटले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात चव्हाण म्हणाले की, देशामध्ये सध्या इंधनटंचाईसारखी कोणतीही गंभीर परिस्थिती नाही. केंद्र सरकारकडे दीड ते दोन महिने पुरेल इतका इंधनसाठा उपलब्ध आहे. मात्र, जागतिक स्तरावर निर्माण होत असलेली युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सावधगिरीचा आणि काटकसरीचा संदेश दिला आहे.

गुजरातमधील एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी नागरिकांना पेट्रोल-डिझेलचा वापर आवश्यक तेवढाच करावा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे, शक्य असल्यास कार शेअरिंगचा वापर करावा, अनावश्यक परदेश दौरे टाळावेत तसेच बैठका ऑनलाईन माध्यमातून घ्याव्यात, असे आवाहन केले होते. तसेच पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचाही सल्ला त्यांनी दिला होता.या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून होत असलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना चव्हाण म्हणाले, ''पंतप्रधानांचे आवाहन हे राष्ट्रहितासाठी आहे. ज्यांना या आवाहनाचा आक्षेप असेल त्यांनी किलोभर सोने खरेदी करावे, बादलीभर तेलाने आंघोळ करावी आणि पेट्रोल-डिझेल फुकट वाटावे.''

उन्हाळी सुट्टीतील मे-जून वेतन वेळेवर द्या

# शिक्षक व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक - बाबासाहेब बोडखे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यातील खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उन्हाळी सुट्टी कालावधीतील मे व जून २०२६ चे नियमित वेतन वेळेवर अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषद राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव रणजित देओल यांच्यासह शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना दिल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अंतर्गत येतात. या नियमावलीतील नियम क्रमांक १३ नुसार उन्हाळी सुट्टी कालावधीतील मे व जून महिन्यांचे नियमित वेतन संबंधित कर्मचाऱ्यांना कायदेशीररित्या देय ठरते.

मात्र, अतिरिक्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या समायोजनाच्या कारणावरून अनेक शाळांची मे २०२६ ची वेतन देयके नाकारली जात असल्याचा आरोप शिक्षक परिषदेकडून करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला असून, शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

शिक्षक परिषदच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांच्या नियमबाह्य व बेकायदेशीर निर्णयांमुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक १३ चा विसर शिक्षण विभागाला पडल्याचे दिसून येत असून, ही अत्यंत गंभीर बाब असल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात आली.

उन्हाळी सुट्टीच्या काळातही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आर्थिक जबाबदाऱ्या कायम असतात. अशा परिस्थितीत वेतन रखडल्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवू शकते. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांना नियमांनुसार मे व जून २०२६ चे नियमित वेतन वेळेवर अदा करण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी शिक्षक परिषदेकडून करण्यात आली आहे.

अतिरिक्त शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांचे समायोजन ही स्वतंत्र प्रशासकीय प्रक्रिया असून त्याचा परिणाम उन्हाळी सुट्टीतील नियमित वेतनावर होऊ शकत नाही. कोणत्याही कारणास्तव शिक्षक व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक व नियमबाह्य आहे.
–बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)

# कोणतेही पिंपळाचं झाड तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी, हा उपक्रम आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे - आमदार सुहास बाबर

## एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु होऊन सांगली जिल्ह्यात हरित क्रांतीला प्रचंड प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.

दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी घट्ट नाळ जोडलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते होते. सांगली ग्रामीण भागातील टेंभू योजनेचे जनक असा त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात त्यांचा राजकीय वारसा मिळालेल्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ७८१७८ इतके मताधिक्य घेतले तेव्हाच त्यांनी ठरवले की आमदारकीच्या काळात मताधिक्या एवढे वृक्ष मतदारसंघात लावावेत. याबाबत बोलताना आमदार सुहास बाबर म्हणाले की एका पिंपळाच्या झाडाच्या पुनर्वसनाच्या प्रेरणेतून आज मोठी हरित लोक चळवळ खानापूर आटपाडी परिसराच्या पर्यावरणात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे.

समाज माध्यमांवर पिंपळाची गोष्ट प्रसारित केल्यानंतर त्याला मिळालेल्या तुफान प्रतिसादातून हजारो लोकं जोडली गेली आणि दररोज जोडली जात आहेत. लोकं स्वयंप्रेरणेने जागा, पाणी, झाडं, श्रमदान करण्यासाठी पुढे येत आहेत. ट्री आर्मी असं नामकरण लोकांनीच केलं असल्याचं आमदार बाबर म्हणाले. आपल्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशी ५३०० आंब्याची कलमे रुजवल्याची माहिती त्यांनी दिली. तर विटा नागरपालिकेच्या नगरसेवकाने या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून चार वर्षांची वाढलेली ५२ झाडं भेट दिली तसेच आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले आहे असे ते म्हणाले. सांगलीचे जिल्हा प्रशासन, वन विभाग यांच्या माध्यमातून एक एकर जागेत जपानी पद्धतीचा मियावकी जंगल विकसित करण्याचे निश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. गायरान जमिनीवर, रस्त्यालगत महाराष्ट्राच्या मातीत नैसर्गिकपणे उगवणारी झाडे रुजवण्याचा उपक्रम मतदारसंघात आता सुरु आहे. पूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर ''ग्रीन टनेल'' वाहनचालकांना विशेषतः दुचाकीस्वारांना सावली आणि थंडावा देत पण महामार्ग आणि रस्ता रुंदीकरणामुळे हे ग्रीन टनेल नाहीसे झाले, त्याला पूर्ववत करण्याचे ध्येय ठेवल्याचे आमदार बाबर यांनी सांगितले.

येत्या ५ जून रोजी होणाऱ्या वसुंधरा दिनानिमित्त अधिक प्रमाणात वड, पिंपळ, बहावा, करंज, चिंच अशा डेरेदार वृक्षांची लागवड सुरु आहे, त्यांच्या संगोपन आणि संवर्धनासाठी ट्री आर्मी कटिबद्ध असून जिल्ह्यातील विविध व्यक्ती, व्यापारी संघटना, संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. नोकरी धंद्यानिमित्त खानापूर आटपाडीपासून दूर राहणाऱ्या लोकांना पुन्हा एकदा आपल्या गावाशी नाळ जुळवायची असेल तर सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार सुहास बाबर यांनी केले.

# नेवासा पोलिसांची मोठी कारवाई; पिंपरी शहाली येथे गावठी कट्टा बाळगणाऱ्याला अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध रित्या गावठी कट्टा बाळगणाऱ्या एका इसमावर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पिंपरी शहाली परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गावठी कट्टा हस्तगत करण्यात आला आहे.




नेमकी घटना काय? मिळालेल्या माहितीनुसार, सुयश नानासाहेब नवथर (रा. पिंपरी शहाली, ता. नेवासा) याने दिनांक १० मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास पिंपरी शहाली गावात बैलगाडा शर्यत संपल्यानंतर स्वतःकडील गावठी कट्ट्यातून फायरिंग केले होते. या दरम्यान तो स्वतःच जखमी झाला होता. सदर आरोपी हा गावठी कट्ट्यासह गावात येणार असल्याची खात्रीशीर माहिती नेवासा पोलिसांना मिळाली होती.

पोलिसांचा सापळा आणि अटक– माहिती मिळताच पोलीस निरीक्षक *सागर ढिकले* यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, सुमित करंजकर, नारायण डमाळे, अतुल शेळके आणि कैलास म्हैसमाळे यांच्या पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २०,००० रुपये* किमतीचा एक स्टीलचा देशी बनावटीचा गावठी कट्टा (ज्याला काळ्या पट्टीची ग्रिप आहे) हस्तगत करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल – या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नारायण एकनाथ डमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ३८५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम ११०, १२५(ब) सह शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा पोलीस पथकाने केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील करत आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठानतर्फे अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठान यांच्या वतीने भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेला अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे यांच्यासह श्रिया देशमुख अतुल शुक्ल अथर्व देशपांडे सार्थक भोंग देवांग कुलकर्णी अभिराम कुलकर्णी अथर्व कुकडे संकल्प उदास सायली कुलकर्णी ऋतू वैद्य अवधूत रामदासी अद्वैत शुक्ल विकास कुलकर्णी अमित डोंगरे,संजय जोशी ,उपेंद्र धर्माधिकारी, प्रकाश जोशी ,उदय जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.



यावेळी अध्यक्ष विजय देशपांडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''छत्रपती संभाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर धर्मरक्षणासाठी आणि स्वराज्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणारे प्रेरणास्थान होते. त्यांच्या बलिदानामुळे स्वराज्याची ज्योत अखंड तेवत राहिली. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या विचारांमधून राष्ट्रप्रेम, धैर्य आणि स्वाभिमान यांची प्रेरणा घ्यावी. समाजात एकता, संस्कार आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. उपस्थितांनी जयघोष करत छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले.

## पारनेर तालुक्यातील पाणीटंचाई प्रश्नावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर तालुक्यातील पाणीटंचाई, टँकर व्यवस्थापन, रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तसेच पशुधनासाठी चारा उपलब्धतेच्या प्रश्नावर महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्याप टँकर उपलब्ध नसल्याची बाब समोर आल्यानंतर नवीन टँकर तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच टँकर पुरवठा, पाणीपुरवठा योजना व चारा व्यवस्थापनातील निष्काळजीपणा अजिबात सहन केला जाणार नसल्याचा कडक इशारा पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिला. कान्हूर पठार १६ गाव पाणीपुरवठा योजना, मांडओहोळ धरण, जाधववाडी पाणी योजना आदी प्रश्नांवर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत नागरिकांना वेळेत पाणी न मिळणे ही गंभीर बाब असल्याचे स्पष्ट केले. ''अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. बैठकीत रखडलेल्या योजनांवर तातडीने कार्यवाही करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया, प्रांताधिकारी चिंचकर, तहसीलदार गायत्री सौंदाने, गटविकास अधिकारी सोनकुसळे, पोलीस निरीक्षक संतोष खेडेकर, पोलीस निरीक्षक गडकरी मॅडम, विनायक देशमुख, प्रशांत गायकवाड, विश्वनाथ कोरडे, सुनील थोरात, विजूभाऊ औटी, राहुल शिंदे, बाबासाहेब तांबे, वसंत चेडे, गणेश शेळके, योगेश रोकडे, दत्तानाना पवार, मनोज मुंगसे, दिनेश बाबर, देवराम मगर, युवराज पठारे, विक्रम कळमकर, शंकर नगरे, युवराज पाटील, देवराम मगर, भास्कर उचाळे, विठ्ठल कवाद, संतोष सालके, सुषमा रावडे, अश्विनी थोरात, सोनाली सालके, सुधामती कवाद, अपर्णा खामकर, कविता औटी, संग्राम पावडे, अजिंक्यतारा दरेकर, विवेक मोरे, पंढरीनाथ उंडे, विकास रोकडे, अमोल रोकडे, संतोष गायकवाड, यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून पारनेर न्यायालयाच्या नवीन इमारत कामाची पाहणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. राधाकृष्णजी विखे पाटील साहेब पारनेर तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी पारनेर येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा आढावा घेतला. यावेळी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर उपस्थित होते. संबंधित इमारतीचे काम दर्जेदार, नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावे याबाबत यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. नवीन न्यायालयीन इमारतीमुळे पारनेर तालुक्यातील नागरिकांना अधिक सुसज्ज व आधुनिक न्यायालयीन सुविधा उपलब्ध होणार असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर तालुक्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधांसह न्यायव्यवस्थेच्या बळकटीकरणालाही प्राधान्य दिले जात असल्याचे नमूद केले. तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध विकासकामांना गती मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## भांडगावात व्यावसायिकाचा खून करून साडेबारा लाखांची लूट

यांनी फिर्याद दिली आहे. दिनांक १५ मे रोजी मध्यरात्री साडेबारा ते दुपारी साडेतीन या कालावधीत ही घटना घडली. भांडगाव येथील भुजबळवस्ती येथे राहणारे संदीप खरमाळे यांचा मुलगा फिर्यादी सिद्धेश हा निर्मलनगर, सावेडी येथे राहण्यास असून, सावेडीत तुळजाई मटण खानावळ चालवतो. गावी आई-वडिलांकडे त्याचे नेहमी येणे-जाणे होते. कौटुंबिक कार्यक्रमानिमित्त गावी असलेले फिर्यादी हे पत्नी, आई व लहान मुलीसह दिनांक १२ मे रोजी सावेडी येथे घरी आले.

दिनांक १४ रोजी फिर्यादीला मुलगी झाल्याचे कळाल्यानंतर वडील दिनांक १४ मे रोजी नगरला आले व दुपारी साडेतीनच्या सुमारास गावी भांडगावला गेले. त्यानंतर रात्री ही घटना घडली.

## बिअरबार दुकाने फोडणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

गुन्ह्यातील मुद्देमाल पळसे (ता.जि.नाशिक) येथील हॉटेल लकी बार अँण्ड रेस्टॉरंटचे चालक किरण रामदास उगले व विवेक अरुण उगले यांना विक्री केला असल्याचे व विवेक अरुण याने चोरी करण्यासाठी वाहन उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. किरण उगले व विवेक उगले यांचा शोध घेता किरण रामदास उगले (रा. सामनेर ता. इगतपुरी जि.नाशिक हल्ली रा. लकी बार रेस्टॉरंट पळसे नाशिक) हा मिळून आला. किरण उगले याच्याकडून ४ लाख ५ हजार १६० रुपये किमतीची विदेशी दारू व दीड लाख रुपये किमतीची कार (एमएच ४८.एफ ०७२३) असा एकूण ५ लाख ५५ हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींनी संगमनेरमध्ये दोन, वावी व पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) येथे अशाच प्रकारचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपास घारगाव पोलीस ठाणे करीत आहे.

## भाड्याच्या उत्पन्नावर ५० टक्के कर म्हणजे नागरिकांवर अन्याय - नगरसेवक श्रीपाद छिंदम

शिक्षण कर ५ टक्के, वृक्ष कर अर्धा टक्का आणि जलमल कर १ टक्का अशा विविध करांची भर टाकण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे सामान्य नागरिकांना एकूण ४२ ते ४३ टक्क्यांपर्यंत कराचा भार सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.व्यावसायिक गाळे आणि दुकानदारांसाठी ही आकारणी ५१ टक्क्यांपर्यंत पोहोचत असल्याने व्यापारी वर्ग आर्थिक अडचणीत सापडल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. शहरातील अनेक वाणिज्यिक इमारती रिकाम्या पडल्याचे कारण म्हणजे प्रचंड घरपट्टी आणि भाडेआधारित कर असल्याचा दावा त्यांनी केला. पुणे आणि मुंबईसारख्या महानगरांपेक्षा जास्त कर आकारला जात असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील शोरूम आणि व्यावसायिक नगरमध्ये येण्यास मागे हटत असल्याने शहरातील आर्थिक दळणवळणावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## राजू सुद्रिक यांना मानाचे पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान

यादीत राजू सुद्रिक यांनी आपल्या कर्तृत्वाने स्थान मिळवले आहे.उत्कृष्ट सेवा अभिलेख:गेल्या १५ वर्षांपासून श्री.सुद्रिक यांनी अहिल्यानगर पोलीस दलात विविध जबाबदाऱ्या अत्यंत पारदर्शकपणे पार पाडल्या आहेत.

कर्तव्याप्रती निष्ठा:त्यांचा सेवा काळ हा कोणत्याही डागाविना आणि अत्यंत शिस्तबद्ध राहिला आहे, ज्याची दखल थेट राज्य स्तरावरून घेण्यात आली. प्रशासकीय कौशल्य: गुन्हे तपासात मदत असो वा कायदा-सुव्यवस्था राखणे, प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे.

सध्याची जबाबदारी आणि कौतुकाचा वर्षाव श्री.राजू आप्पासाहेब सुद्रिक (ब.नं. ३४५) हे सध्या एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशामुळे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याच्या पोलीस दलाची मान अभिमानाने उंचावली आहे.

नूतन पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच आपल्या दलातील अशा कर्तबगार अंमलदाराचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व स्तरांतून अभिनंदन सर्वसामान्यांशी आपुलकीने वागणारे आणि गुन्हेगारांवर कायद्याचा वचक ठेवणारे हवालदार म्हणून राजू सुद्रिक यांची ओळख आहे. त्यांना हा मानाचा मेडल मिळाल्याबद्दल पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी आणि अहिल्यानगरच्या नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

(पान १ वरून)

## राष्ट्रवादी – भाजप नगरसेवकांत तू, तू – मै, मै झाल्यामुळे सभा स्थगित

काळात मतं विकत घेण्यासाठी वाटलेले कोट्यावधी रुपये या पाच वर्षात शहराला कर्जाच्या खाईत लोटून वसूल करायचे आहेत. त्यासाठी त्यांचा आटापिटा सुरू असल्याचा आरोप, किरण काळे यांनी केला आहे.

...तर भाजपने सत्तेला लाथ मारावी, ठाकरे शिवसेनेचा खोचक सल्ला :
सभेची विषय पत्रिका ठरवताना भाजपला विचारात घेतल जात नाही. पालकमंत्री व माजी खासदारांनी केलेल्या सूचनांना राष्ट्रवादी केराची टोपली दाखवते. विकास कामांच्या टेंडरचा मलिदा केवळ राष्ट्रवादीच्याच कार्यकर्त्यांना मिळतो. भाजप नेतृत्वाचा मान राष्ट्रवादी ठेवत नाही. भाजपचे नेतृत्व अनुभवी, मोठे आणि राज्य पातळीवरील आहे. मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतील आहे. स्वाभिमान गहाण ठेवावा लागत असेल, वारंवार अवमान होत असेल तर भाजपने अशा सत्तेला खरं तर लाथ मारली पाहिजे, असा खोचक सल्ला ठाकरे शिवसेनेच्या वतीने किरण काळे यांनी दिला आहे.

''अर्थ''पूर्ण हितसंबंध जोपासणाऱ्या विषयांनाच प्राधान्य का ? :
पंपिंग स्टेशन, सावेडी ते कल्याण रोड – अमरधाम पर्यंत ३० मीटर रुंदीच्या रिंग रोड करिता बाधित होणाऱ्या जमिनीचे भूसंपादन, केडगावच्या सर्वे नंबर २०८ मधील जागेचे रस्त्यासाठी भूसंपादन करणे, यापूर्वी निकृष्ट झालेल्या कामांच्या अनामत रकमा परत करणे, बँकांकडून शेकडो कोटींची कर्ज काढणे आदी विषय सभेच्या विषय पत्रिकेवर होते. यासाठी मनपाला कोट्यावधी रुपये लागणार आहेत. मनपा तिजोरीत खडाखडात असताना जनहिताचे प्रश्न सोडून सत्ताधाऱ्यांच्या केवळ ''अर्थ''पूर्ण हितसंबंध जोपासणाऱ्या विषयांनाच प्राधान्य का दिले जाते ?, असा सवाल किरण काळे यांनी केला आहे.